अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. 900/8070
दिनांक :- 26/08/2019

---

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५,
अपिल क्र. अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय,
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय/पुणे मनपा/अपिल/२१९८ दिनांक ०४/०६/२०१९.

१) अपिलकर्ता श्री नेताजी नामदेव शेरखाने
रा – सं.नं.१३१/१ पानमळा वसाहत,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०३०.

२) जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय,
पुणे महानगरपालिका

श्री नेताजी नामदेव शेरखाने अपिलार्थी
विरुध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, शिवाजीनगर-घोलेरोड, पुणे मनपा.

---

माहितीचा अधिकार २००५ चे कलम १९(१) अन्वये सुनावणी दि. २०/०८/२०१९

अपिलकर्ता श्री नेताजी नामदेव शेरखाने यांचा इकडील कार्यालयाकडील आ.क्र १११२४ दि. १८/०३/२०१९ अन्वये माहिती अधिकारातील अर्ज प्राप्त झाला आहे. अपिलकर्ता श्री नेताजी नामदेव शेरखाने यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांचेकडे पुणे महानगरपालिकाचे सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातून घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व प्रभागांमध्ये दिलेल्या वर्कऑर्डर व झालेल्या बिलांच्या मोजमापीच्या सर्व सांक्षाकित प्रती (विकेंद्रित कामासाहित) मिळणेसाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जान्वये अर्ज सादर केला आहे.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे मनपा यांनी अपिलकर्ता यांस त्यांनी नमूद केलेली माहिती त्यांना कार्यालयीन वेळेत दुपारी ३ ते ५ या दरम्यान इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दाखविण्यात येईल तदनंतर त्यांना आवश्यक असणाऱ्या माहितीचे प्रती पान र.रु. २/- प्रमाणे प्रशासकीय शुल्क पुणे मनपा कोषागृहात भरल्यास सदरचे माहितीच्या झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे पत्राने कळविले आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधिची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १८/०३/२०१९ | १७/०४/२०१९ | निरंक | निरंक | निरंक |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे :- माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती मिळाली नसल्याने सदरचे अपिल दाखल करण्यात आले असे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०१/०६/२०१९ | ०४/०६/२०१९ | नाही | निरंक | जा.क्र. १६६९ दि.१४/०६/२०१९<br>जा.क्र. १९४८दि.२५/०६/२०१९<br>जा.क्र. ३२५५ दि.०२/०८/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २०/०८/२०१९ वेळ दुपारी ११.३० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिका-याने दिलेले उत्तर/माहिती- |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिकाचे सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातून घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व प्रभागांमध्ये दिलेल्या वर्कऑर्डर व झालेल्या बिलांच्या मोजमापीच्या सर्व सांक्षाकित प्रती (विकेंद्रित कामासाहित) मिळणेबाबत. | जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांस त्यानी नमूद केलेली माहिती त्यांना कार्यालयीन वेळेत दुपारी ३ ते ५ या दरम्यान इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दाखविण्यात येईल तदनंतर त्यांना आवश्यक असणाऱ्या माहितीचे प्रती पान रु. २/- प्रमाणे प्रशासकीय शुल्क पुणे मनपा कोषागृहात भरल्यास सदरचे माहितीच्या झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे पत्राने कळविले आहे. |

सदरचे अपिलास अपिलार्थी अनुपस्थित असल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## -आदेश-

प्रस्तुत प्रकरणी नैसर्गिक न्याय तत्वानुसार अपिलकर्ता यांस जा.क्र. जीडब्ल्यूओ/१६६९ दि.१४/०६/२०१९, जा.क्र. १९४८ दि.२५/०६/२०१९ व जा.क्र. ३२५५ दि.०२/०८/२०१९ अन्वये अपिलास उपस्थित राहणेसाठी संधी देऊनही सदरचे तिन्ही वेळेच्या अपिलास अपीलकर्ता अनुपस्थित राहिले असल्याने सदरचे अपील निकालात काढण्यात येत आहे.

उपरोक्त सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला असून सदर अपिल निकालात काढण्यात येत आहे.

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

(किशोरी शिंदे)
अपिल प्राधिकारी *तथा*
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका